# जनावरांचे नोंदीकरण

**डॉ. प्रविण बनकर,**
सहाय्यक प्राध्यापक,
पशुअनुवांशिकीशास्त्र विभाग
स्ना.प.प.संस्था, अकोला.

पशुपालन हा आता फक्त जोडधंदाच राहिला नसून आता व्यवसायाचे स्वरूप धारण करत आहे. स्वयंरोजगाराची हुकमी वाट म्हणून ग्रामीण भागातीलच नव्हे तर शहरी भागातील तरूण वर्गाला सुध्दा पशुपालन, दुग्धव्यवसाय आज खुणावत आहे. भारतासारख्या जैविक विविधतेने संपन्न देशात जनावरांच्या विविध उपयुक्त जाती व उपजाती दिसून येतात. प्राचीन काळापासूनच शेती पुरक घटक म्हणून पशुधनाचा परिचय आहे. दुध, मांस, अंडी, लोकर, कातडी इ. अनेक उत्पादने मिळवण्यासाठी गाई, म्हशी, शेळी, मेंढी, कोंबडया पाळल्या जातात. पुर्वापार पशुपालन होत असले तरी व्यवसाय म्हणून आजचा होतकरू वर्ग जेव्हा पशुसंवर्धनाकडे पाहतो तेव्हा काही व्यवस्थापकीय बाबींच्या अभावामुळे त्याच्या पदरी अपयश येते. आपला कळप 3–4 जनावरांपासून ते 40 – 50 किंवा त्यापेक्षाही मोठा असला तरी, उत्पादनात नफा मिळावा हा प्रत्येकाचा हेतू असतो. यासाठी बरेचदा अत्याधुनिक यंत्रणेने सुसज्ज गोठा, उत्तम जातींची जनावरे, मजूर इ. घटकांवर पुष्कळ खर्च होतो आणि त्यायोगे नफा किरकोळ मिळतो तेव्हा अशा स्थितीत काही व्यवस्थापकीय बाबींचा विचार व अवलंब केल्यास आपला नफ्याच्या आलेख उंचावू शकतो. अशा बाबीपैंकी एक अत्यंत महत्त्वाची, कमी खर्चाची व अधिक फायदयाची बाब म्हणजेच – जनावरांचे नोंदीकरण ! या बद्दल आपण माहिती पाहूया.

**जनावरांचे नोंदीकरण** म्हणजे जनावरांच्या महत्त्वाच्या तसेच उत्पादन, प्रजनन अशा गुणधर्मीय बाबींची लेखी स्वरूपात नोंद करून ठेवणे. जनावरांच्या विविध प्रजाती निहाय, गुणधर्मानुसार या नोंदी घेतल्या जातात उदा. गाई–म्हशी दुधाच्या नोंदी, शेळी – कोंबडया यांच्यात वजनाच्या नोंदी, मेंढीतील लोकर उत्पादनाच्या नोंदी इ. जनावरांचे व्यवस्थापन करताना त्यांच्या उत्पादना खेरीज आजार, खादयपुरवठा, मृत्युदर, विक्री इ. अनेक बाबींचाही विचार करावा लागतो. या बाबींचा योग्य समतोल राखता अल्यास नफा मिळवणे शक्य होते. व्यवस्थापक म्हणून फक्त तुमच्या कळपात किती जनावरे आहेत याची माहिती असून चालत नाही. तुमच्या कळपातील किती टक्के जनावरे उत्पादनक्ष आहेत, किती आजारी आहेत? दररोज किती खादय लागते? मरतुकीचे प्रमाण किती आहे? जन्मदर किती आहे.? उत्पादनाचा आलेख चढता आहे की उतरता आहे? अशा स्वरूपाच्या प्रश्नांचाही पाठपुरावा

करावा लागतो. यासाठी आपण जनावरांच्या योग्य व अचुक नोंदी केल्यास आपले होणारे नुकसान टळू शकते.

**नोंदी का कराव्यात ?**

1. कळपाची पैदासक्षमता, उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी त्यांची आनुवांशिकी इतिहास माहिती असणे गरजेचे ठरते. यासाठी **वंशावळ पत्रिका – Pedigree Sheet** असणे आवश्यक आहे. कळपातील जनावरांच्या वंशावळीची माहिती असल्यास अत्तम प्रतिची संतती पैदास व्यवस्थापन करून निर्माण करता येते. उदा. तोच तो वळू वापरून कळपात आंतरपैदास होवून उत्पादन क्षमता, प्रजननक्षमता खालावते.
2. कळपातील प्रत्येक जनावराची उत्पादनक्षमता भिन्नभिन्न असते, तेव्हा कळपातील सरस व उच्च प्रतिच्या पैदासक्षम जनावरांच्या **निवडीसाठी** नोंदी आवश्यक असतात.
3. आपल्याच कळपातील जनावरांतील **तुलनात्मक अभ्यास** करण्यासाठी किंवा दुसऱ्या कळपाशी तुलना करतांना आपल्या कळपाची उत्पादन पातळी समजून घेण्यासाठी नोंदी उपयोगी आहेत.
4. जनावरांचे **आरोग्य** हा या व्यवसायाचा कणा आहे. आपल्या कळपातील निरोगी जनावरे, आजारी/जखमी जनावरे इ. चे प्रमाण, औषधोपचारांचे नियोजन अशा बाबींचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठी नोंदी आवश्यक ठरतात.
5. एखादया कळपातील जनावरांचे व्यवस्थापन करतांना यांचे आकलन नोंदीद्वारे होते.

**नोंदी करण्याच्या पद्धती.**

नोंदी घेतांना आपल्या कोणकोणत्या गुणधर्माचा विचार करावयाचा आहे, त्यानुसार कच्चे आराखडे बांधावे लागतात. उदा. गाई–म्हशीत प्रामुख्याने दुध उत्पादन गुणधर्मसंबंधी बाबींचा आपण विचार करू.

आजमितीला विविध जनावरांतील गुणधर्मानुसार, उत्पादनानुसार व व्यवस्थापकीय बाबींनुसार विहीत नमुने सहज उपलब्ध आहेत. सर्वसाधारणपणे या नोंदी कागदी म्हणजेच वहया/नोंदवहयात केल्या जातात. काही गोष्टींच्या नोंदी दररोज घ्याव्या लागतात, उदा. दुध उत्पादन तर काही गोष्टींच्या नोंदी ठराविक कालानुसार घ्याव्या लागतात. उदा. जन्मतः वजन.

अत्यंत प्रगतशील व विस्तृत व्यावसायीक कळपांमध्ये आज संगणकाच्या मदतीनेही या नोंदी घेण्यात येतात. कमीत कमी जनावरे असली तरी त्यांच्या नोंदी आपण सहज घेवू शकतो. बरेचदा पशुपालक बंधु घरातील कॅलेंडरवर देखील महत्त्वाच्या बाबींच्या नोंदी घते असतात. मात्र या नोंदी एकसंघ नसलयाने त्यावरून काही बोध घेणे जिकीरीचे / अवघड

काम होते. तेव्हा अशावेळी विशिष्ट आराखडयाच्या नोंदपत्रांचा वापर केल्यस त्याचा नक्कीच उपयोग होईल.

**नोंदी करणाचे प्रकार.**

विविध गुणधर्म व उपयुक्तता नुसार नोंदीकरणाचे विविध प्रकार आहेत, त्यातील काहींची ओळख आपण घेवू.

1. **वंशावळ पत्रिका — Pedigree Sheet :—**

   कळपातील जनावरांचे अनुवांशिक ईतिहास पुढील प्रजनन नियोजनाच्या दृष्टीने उपयुक्त असतो, म्हणून वंशावळीची नोंद महत्वाची ठरते. यामध्ये एखदया जनावराच्या आई वडिलांशिवाय जन्मदिनांक, जात, लिंग, जन्मतः वजन, जन्मदोष अशा पूर्वायुष्याच्या नोंदी तर ठरावीक कालावधीत होणारी वजनवाढ, उत्पादनवाढ, विक्री, मृत्यु अशा संपुर्ण आयुष्यातील ठळक बाबींचा विचार केल्या जातो.

2. **वजनवाढ नोंदवही. :—**

   शेळी, कोंबडया, मेंढी अशा मांस उत्पादक प्राण्यांत ठरावीक काळात होत जाणारी वजनवाढ ही विक्रीसाठी महत्त्वाची असते. कमी वयात जास्त वजन धारणता हे नफ्याचे प्रतिक आहे. म्हणून वजन वाढीच्या नोंदीचा तपशील घेतल्या जोतो.

3. **खाद्यपुरवठा नोंदवही :—**

   आहार व्यवस्थापन करतांना उपलब्ध चारा पाणी व आवश्यक खादयाची तरतूद करावी लागतेच म्हणून चारापाण्याची नोंद घ्यावी लागते.

4. **पशुधन नोंदवही :—**

   कळपातील एकूण जनावरांची संख्या, नर—मादी, वयस्क—बच्चे, मृत्यु अशा बाबींची माहिती पशुधन नोंदवहीत ठेवावी लागते.

5. **दुध उत्पादन नोंदवही :—**

   कळपातील जनावरांतील दुभत्या गाई, भाकड गाई इ. चे प्रमाणावर उत्पादन अवलंबून असते. म्हणून दुधाच्या नोंदी घेतांना जनावरांचा ओळख क्रं. **(Tag No.)**, जन्मदिनांक, प्रसवदिनांक, दुधमोजणी, वेताची लांबी अशा गोष्टींचा विचार करावा लागतो.

6. **आरोग्य नोंदवही :—**

   कळपातील आजारी, रोगी जनावरे, लसीकरण, औषधोपचार, मरतुक इ. च्या नोंदी.

7. **विक्री / खरेदी नोंदवही :—**

   कळपातील जनावरांची खरेदी विक्रीसंबंधीच्या नोंदी.

8. **कॅशबुक :—** व्यवस्थापनावर केला जाणारा खर्च, नफा—तोटा इ.

9. **दैनंदिनी कामकाज नोंदवही :—**

कळपात /फार्मवर होत असलेल्या दैनंदिन कियांचा तपशील

10. **मजूर नोंदवही :—**

व्यवस्थापन करतांना मजूरसंख्या, त्यांवर होणारा खर्च, कामाचे विभाजन इ. बाबींच्या नोंदी.

अशा प्रकारच्या नोंदी सर्वसाधारणपणे घेतल्या जातात. कुठल्याही जनावराचे उत्पादन हे त्याच्या अंगभूत आनुवांशिक क्षमता व पर्यावरणावर अवलंबून असतात. उदा. विशिष्ट जातींची जनावरे दुधाळ असतात तर ऋतूमानांनुसार दुध उत्पादनातही फरक दिसून येतो. तेव्हा अशावेळी या नोंदीमध्ये काही गणिती सुत्रे वापरून योग्य त्या दुरूस्त्याही केल्या जातात.

बरेचदा मोठया कळपात काही नोंदी अपूर्ण किंवा चूकीच्या घेतल्या जातात व त्यामूळे त्यावरून निष्कर्ष काढताना अडचणी उद्‌भवतात. अशावेळी नोंदवहयांचे ठराविक गणिती सुत्रानुसार प्रमाणीकरण करावे लागते.

आपण नोंदवलेल्या बाबींवरूनही बरेचदा इतरही गुणधर्माचे स्वरूप लक्षात घेता येवू शकते. उदा. मृत्युदर ठरवतांना एकुण संख्यापैकी मृत जनावरांचे शेकडा प्रमाण लक्षात घेवून किंवा एकून कृत्रिम रेतनापैकी गाभण राहण्याच्या प्रमाणावरून सुफलता अंक, इ.

**नोंदी कशा कराव्यात ?**

- सहजगत्या निरीक्षण वा मोजमाप करून घेता येणाऱ्या नोंदी
- सुटसुटीत बाबी
- उपयोगी गुणधर्म
- ज्या माहिती वरून अर्थबोध होईल अशा बाबी

**नोंदी करण्याचे फायदे**

1. कळपातील एकुण पशुधनाचा संक्षिप्त आढावा घेणे शक्य होते.
2. आहार व्यवस्थापण, प्रजनन, आरोग्य, उत्पादन अशा व्यवस्थापकीय बाबींचे नियोजन करणे सुलभ होते.
3. कळपाची सद्यस्थिती समजते, जन्मदर, मरतुकीचे प्रमाण
4. आर्थिक बाबींची संक्षिप्त माहिती मिळते.
5. नोंदीकरणाने कळपाची अनुवांशिक सुधारणा करणे शक्य होते व पशुसंवर्धन होते.